स्थापना
१ मे १९५७

कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११०३७
www.apmcpune.in / Email: admin@apmcpune.in, kubspune37@rediffmail.com

जा.क्र.प्रशा/स्थापत्य/गू.भू. विभाग/हमाल/पत्राशेड/प्रसिध्दीपत्रक/९८७ /२०२६-२७ दि. ०५/१२/२०२६

प्रसिध्दीपत्रक

विषय :- कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेच्या, गूळ-भुसार विभागातील शिंदे ड्रायफ्रुट्सच्या शेजारील नाल्याच्या जागेमध्ये हमालांकरिता पत्राशेड करणेबाबत...

सक्षम ठेकेदारांना कळविणेत येते की, **कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेच्या, गूळ-भुसार विभागातील शिंदे ड्रायफ्रुट्सच्या शेजारील नाल्याच्या जागेमध्ये हमालांकरिता पत्राशेडचे काम** करावयाचे आहे. सदर काम हे शासनाने आदेशित केलेल्या सर्व अटींचे काटेकोरपणे पालन करूनच करावयाचे आहे. काम करतेवेळी कोणत्याही कामगारांची वित्त / जिवितहानी / अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. काम करावयाच्या ठिकाणी आपण स्वत: (ठेकेदार) यांनी संस्थेच्या स्थापत्य विभागाच्या संबंधित अधिकारी / कामाचे वास्तुशास्त्रज्ञ / कर्मचाऱ्यासोबत जाऊन, प्रत्यक्षरित्या कामाची पाहणी करुन तद्नंतरच आपल्या मोहरबंद दरपत्रके सादर करावीत. काम करतेवेळी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत ठेकेदाराची राहील.

तरी सदर कामाची अल्प मुदतीचे मोहरबंद दरपत्रके **दि. ५ /१२/२०२६** ते **दि. ७/१२/२०२६** अखेर स्थापत्य विभागात उपलब्ध आहेत. सादर झालेली मोहरबंद अल्प मुदतीचे दरपत्रके शक्य झाल्यास त्याच दिवशी अथवा **दि. १२ /१२/२०२६** रोजी उपस्थित ठेकेदारांसमोर उघडण्यात येतील, कोणतेही अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेने राखुन ठेवला आहे. तसेच **मा. संचालक मंडळ सभेतील ठराव क्र. ६ (२८) अन्वये सदर कामांबाबत संस्थेच्या कंत्राटदार नामिकेवरील कंत्राटदारांकडून दरपत्रके मागवून काम करुन घेणेबाबत निर्णय झालेला आहे.** त्यामुळे बाजार समितीच्या पॅनेलवरील कंत्राटदारांकडून प्राप्त झालेली मोहरबंद दरपत्रके ग्राहय धरणेत येईल, याची नोंद घ्यावी.

सदरचे (www.apmcpune.in) प्रसिद्धीपत्रक मुख्य कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर व बाजार समितीच्या संकेतस्थळावर दर्शविणेत येत आहे.

सचिव
कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

फोन : +९१ २० २४२६०२०३/२४२६२३४९/२४२७२८८७

Scanned with OKEN Scanner